पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: est.section@sus.ac.in, registrar@sus.ac.in

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

परीक्षा व मूल्यमापन विभाग (संचालक कार्यालय)

जावक क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/ २०२६/ 1409 दिनांक 14 OCT 2026

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये,
व विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक संकुले,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ.

**विषय : महाराष्ट्रात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीबाबत**

संदर्भ :
१. विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/पवमुमं/२०२६/१३७८ दि.०८/१०/२०२६.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१३/१०/२०२६ रोजीचे पत्र क्र.संकिर्ण-२०६/प्र.क्र.१८१/विशि-३ अन्वये दि.१४/१०/२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्देश.
३. उच्च शिक्षण संचलनालय यांचे जा.क्र.उशिंस/शिष्य-२०२६-अवर्षण-परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई १३२१७१६ दि.३०/०९/२०२६
४. प्रस्तुत विद्यापीठाची दि.१४/१०/२०२६ रोजीची कृती समिती (Task Force) बैठकीतील ठराव.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ पत्रानुसार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग सोलापूर यांच्या पत्रान्वये विवरणपत्र- अ मधील रकान्यात माहिती भरुन प्राचार्य/संचालक यांच्या प्रमाणपत्रासह विहित कालमर्यादेत म्हणजेच दि.१२/१०/२०२६ पर्यंत परीक्षा शुल्काची रक्कम परत करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांच्याकडे सादर करावा, असे कळविण्यात आले होते.

तथापी संदर्भ क्र.२ मध्ये नमूद प्रमाणे संपन्न झालेल्या बैठकीमधील निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, जे विद्यार्थी शासन नियमानुसार दुष्काळग्रस्त भागातील आहेत, त्यांचे परीक्षा फॉर्म भरत असतांना उक्त सर्व संदर्भीय शासन निर्णय व पत्राचे अवलोकन करुन निर्देशानुसार परीक्षा शुल्काबाबतची आवश्यक ती कार्यवाही व्हावी, तसेच दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म इनवर्ड करताना सदर विद्यार्थी दुष्काळग्रस्त असल्याचे मार्क केल्यावर सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा शूल्क शून्य होईल. तसेच दुष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच परीक्षा शूल्क भरले आहेत अशा विद्यार्थ्यांना शासनाच्या आदेशानुसार व विहित प्रक्रियेने प्रतिपूर्ती करणेत येईल. याबाबतची माहिती विद्यार्थ्यांनी भरलेल्या पावतीसह खाली नमूद केलेल्या रकान्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन dypreexam@sus.ac.in या ई-मेल वर दि.२४/१०/२०२६ पर्यंत पाठवून, सदर बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठास दि.२७/१०/२०२६ पर्यंत सादर करावा. तसेच संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थी हे सदरहू योजनेपासून वंचित राहणार नाहीत याची सर्वोतपरी दक्षता घेण्यात यावी.

**महाविद्यालयाचे नाव :-**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | सत्र | दुष्काळग्रस्त तालुक्याचे नाव | परीक्षा शूल्क | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

आपला स्नेहांकित,

(डॉ. श्रीकांत अंधारे)
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत- १) मा. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर माहितीस्तव.
२) मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभाग, पुणे
३) मा. अध्यक्ष, कृती समिती (Task Force) प्रस्तुत विद्यापीठ